**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९७/२०१९** | **दिनांक ०३/१२/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २७/११/२०१९ ते ०३/१२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०४/११/२०१९ सकाळी ८:३० पासून ०८/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२७/११** | **२८/११** | **२९/११** | **३०/११** | **०१/१२** | **०२/१२** | **०३/१२** | | **०४/१२** | **०५/१२** | **०६/१२** | **०७/१२** | **०८/१२** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | १ | १ | ० | ० |
| ३४.० | ३३.४ | ३४.५ | ३३.५ | ३२.० | ३४.० | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३० | ३१ | ३१ | ३१ |
| २०.४ | २२.४ | २३.५ | २३.५ | २३.० | २३.५ | - | **किमान तापमान (अं.से)** | २२ | २१ | २२ | १९ | १९ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ७ | ८ | ६ | ६ |
| ९१ | ८३ | ८३ | ९१ | ८६ | ८८ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६९ | ७० | ६५ | ४७ | ४४ |
| ४३ | ४१ | ४८ | ५४ | ४५ | ४५ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४२ | ४९ | ४६ | ३६ | २६ |
| १.४ | २.३ | २.१ | ३.१ | १.१ | २.५ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ९ | ८ | ८ | १० | ८ |
| इ.उ. | द | इ.उ. | द | आ.पु. | द. | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |
| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | | | | | | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | | | | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** | | |
| **०.०** | | | | | | **४२३३.४** | | | | **२३५९.६** | | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ४ ते ८ डिसेंबर, २०१९ दरम्यान ढगाळ वातावरण राहील.**

**दिनांक ६ ते १२ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार मध्यम ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **आंबा** | **पालवी अवस्था** | • पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • नारळावर सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडीच्या अळ्या माडाच्या खोडातील मऊ गाभा खाऊन खोड आतून पोखरून काढतात. अळ्या खोडाच्या आत असल्याने प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बुंध्यावर छिद्रे दिसतात व त्यातून ताजा भुसा व तांबूस तपकिरी स्त्राव वाहताना दिसतो. या किडीच्या नियंत्रणासाठी छिद्रातून शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात. माडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये आणि झाल्यास त्याला बोर्डोपेस्ट लावावी. तसेच सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति हेक्टरी २ गंध सापळे लावावेत. |
| **वांगी** | **वाढीची अवस्था** | • वांगी पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून प्रादुर्भावामुळे पाने पिवळी होवून झाडाची वाढ खुंटते त्यामुळे झाड सुकून मुळांवर वेड्यावाकड्या गाठी दिसून येतात. सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी प्रथम कीडग्रस्त झाडे, पिकांची अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावीत व कडूनिंब पेंड १२५ ग्रॅम प्रति रोप बुंध्याभोवती जमिनीत मिसळून द्यावी. तसेच शेतात अधूनमधून मका या सुत्रकृमी विरोधी पिकांची लागवड करावी. |
| **मिरची** | **वाढीची अवस्था** | • मिरची पिकावर फुलकिडे, कोळी व पांढरी माशी मुळे चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. किडी पानातील रस शोषून घेतल्याने मिरचीची पाने सुरकुतून त्यांची वाढ खुंटते. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. + गंधक किंवा मन्कोझेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पुर्नलागवडी नंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.<br>• मिरची पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून प्रादुर्भावामुळे पाने पिवळी होवून झाडाची वाढ खुंटते त्यामुळे झाड सुकून मुळांवर वेड्यावाकड्या गाठी दिसून येतात. सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी प्रथम कीडग्रस्त झाडे, पिकांची अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावीत व कडूनिंब पेंड १२५ ग्रॅम प्रति रोप बुंध्याभोवती जमिनीत मिसळून द्यावी. तसेच शेतात अधूनमधून मका या सुत्रकृमी विरोधी पिकांची लागवड करावी. |
| **कोबी** | **पुर्नलागवड** | • कोबी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ४५ x ४५ से.मी. किंवा ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रति एकरी ८ टन शेणखत, ३५ किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ४० किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **अस्टर** | **पुर्नलागवड** | • अस्टर पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ३० x ३० सेंमी किंवा ३० x ६० सेंमी अंतरावर करावी. नांगरणीच्या वेळेस जमिनीत एकरी १० टन शेणखत मिसळावे. लागवडीच्या वेळेस प्रति एकरी ७८ किलो युरिया, २५० किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ६६ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**